# रस्ते अपघात आणि माझी भूमिका.

— अशोक पांडुरंग धुमाळ.

आजकाल सर्वांचेच दैनंदिन जीवन अत्यंत धावपळीचे, धकधकीचे आणि ते तितकेच भीतीयुक्त बनलेले आहे. कोणत्याही क्षणी कसलीही आपत्ती उद्भवू शकते. त्यात भरीस भर पडते ती या 'रस्त्यावरील अपघातांची' या बाबतीत एकूणच परिस्थिती लक्षात घेता हे रस्त्यावरील अपघात ही एक चिंतेची बाब झालेली आहे. शहर अथवा ग्रामीण भागातही अशा अपघातांचे प्रमाण अधिक वाढलेले आहे. याला कारणे अनेक असतील पण ही वस्तुस्थिती नजरेआड करता येत नाही, आणि म्हणूनच प्रत्येकानेच आपापल्या परीने सतर्क राहून आपापली भूमिका समाज-जीवनातील आपली रोल नीट समजून-उमजून घेतला तर होणारे अपघातच नव्हे तत्सदृश्य असे अनेक अनर्थही टाळता येतील. त्यासाठी प्रत्येक नागरिकाने योग्य ती काळजी, रस्त्यावरून प्रवास करताना, रस्त्यावर वावरताना सावधानता बाळगली पाहिजे. रस्त्यावरील नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. आज लोकसंख्येची बेसुमार वाढ झालेली आहे. लोकसंख्येचा प्रचंड विस्फोटच झालेला आहे. व त्याचा परिणाम (दुष्परिणाम) सर्वच क्षेत्रावर झालेला दिसून येत आहे. अर्थात रस्ते व त्यावरील वाहतूकही त्याला अपवाद राहिलेली नाही. अर्थात त्यावरील नियंत्रणासाठी सर्वतोपरीने प्रयत्न होताना दिसत आहेत. तसेच रस्त्यावरील अफाट गर्दीला योग्य ती वाट (मार्ग) काढण्यासाठी अनेक उपाययोजना, नियमही अंमलात आणले जात आहेत तरीही रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी होतच नाही.

रस्त्यावरील अपघात हे सर्वसामान्यपणे चार घटकांमार्फत होत असतात. त्यात १) वाहनचालक २) पादचारी ३) फेरीवाले ४) रस्ता बांधणारे किंवा दुरुस्ती करणारे अभियंते किंवा ठेकेदार इ. घटकांचा प्रामुख्याने समावेश होत असतो. या घटकांच्या कळत-नकळत घडणाऱ्या हलगर्जीपणामुळे किंवा अयोग्य वर्तनातून रस्त्यावरील अपघात घडून येत असतात. आणि या सर्वांमध्ये, जास्तीत जास्त अपघातांना कारणीभूत ठरणारा घटक म्हणजे वाहनचालक होय. मग तो खाजगी वाहनचालक असेल किंवा सरकारी वाहनचालक कर्मचारी असेल! त्यांची रस्ते अपघातातील असभ्य अशी भूमिका वर्तणूकच त्याला कारणीभूत ठरत असते. थोड्याशा अधिक (जास्त) आर्थिक लाभासाठी ही मंडळी अविश्रांत श्रम करतात - सततची ड्युटी करीत राहतात. अशावेळी त्यांच्या हातातील वाहन हे जरी इंजिनप्रणीत असले तरी ते चालविणारे हात मानवी शरीराचे असतात. व हे मानवी शरीर अविश्रांत श्रमाने थकूनच जाते - आणि मग त्यावर नको तो उपाय म्हणजे नशापाणी करणे. आणि त्याच अवस्थेत वाहनावर आरूढ होणे, साहजिकच त्यांच्याकडून बेदरकारपणे गाडी चालविली जाते आणि त्यामुळे त्यांच्या हातून घडू नये असा भयानक अपघात घडला जातो. त्यामुळे त्याच्या जिवाला धोका तर संभवतोच पण त्याचबरोबर तो इतरांच्याही जिवाला संभवत असतो. आपल्याबरोबर तो इतरांनाही दुःखाच्या खाईत लोटीत असतो. याशिवाय आपल्यावर आपल्या कुटुंबियांची जबाबदारी असते याचे ही भान त्याक्षणी त्याला नसते. इतरवेळी मात्र त्याला हे सारे ज्ञात असते. सारे सारे कळते पण ऐनवेळी वळतेच असे नाही.

P.T.O.

हीच तर खरी शोकांतिका आहे. या भयाण वास्तवाची जाण प्रसंगाचे गांभीर्य ज्या दिवशी या साऱ्या वाहनचालकांना होईल, तो दिवस सोनियाचाच मानला पाहिजे! कांही वाहनचालक आपल्या वाहन चालविण्याच्या कौशल्याचा नको तितका आत्मविश्वास, अभिमान बाळगीत असतात आणि त्याच धुंदीत अगदी बेछूटपणे गाडी चालवितात. कित्येकदा असेही होताना दिसते की "एखादा वाहनचालक कधी एकदाची आपली ड्युटी संपते आणि कधी एकदा घरी जातोय! 'अशी ही घरी जाण्याची घाई। आणि अशी ही घाईच त्याला दाखविते दुःखाची खाई।" मोठाच अपघात घडला जातो. एकंदरीत काय तर अशा पूर्णपणे दुर्लक्षित गोष्टीमुळे वाहन चालकांकडून अगदी नेहमीच नसले तरी वरचे-वर रस्त्यावरील अपघात होत असतात. एक अगदी साधा नियम; वाहन चालवित असताना वाहनचालकाबरोबर किंवा वाहनचालकानेही कुणाबरोबर बोलू नये! पण आपणांस ही अगदी पूर्णपणे नियमबाह्य वर्तनच दिसून येते. एस. टी. कंडक्टर, ड्रायव्हर यांचा तर अगदी सुखनैव वार्तालाप चालू असतो. खाजगी वाहनचालकही गाडीतील इतर व्यक्तींबरोबर अगदी बिनधास्तपणे संवाद साधत असतो. याविषयी जर कुणी त्याला सल्ला दिला तर उलट तोच त्या व्यक्तीला चार गोष्टी अधिक सुनावतो; "अहो, कांही होत नाही. काय होणार एकदा कधीतरी मरायचेच आहे ना?" असेच कांहीसे निराशाजनक, औदासिन्य आल्यागत बोलत असतो. खरंतर वाहन चालकाने आपल्या उपलब्ध करून दिलेल्या सोईसुविधांचा योग्य तो वापर केला तर कितीतरी अपघात तो टाळू शकतो. उदा. वाहनचालकाने आपल्या वाहनाच्या दुतर्फा बसविलेल्या आरशांचा सुयोग्य वापर, उपयोग केला पाहिजे, एखाद्या ठिकाणी वाहन थांबवून चहापानासाठी खाली उतरताना वाहनयंत्राला लावलेली चावी तशीच न ठेवता ती काढून घेतली पाहिजे, निर्गम स्थानकावरून वाहन घेऊन निघताना त्याची योग्य ती तपासणी केली पाहिजे. आपले वाहन इंजिनप्रणीत असल्यामुळे त्यातील पेट्रोल, डिझेल कितपत आहे. चाकातील हवा, इंजिनमधील पाणी इ. साऱ्या गोष्टी नीट तपासून मगच आपले वाहन हाती घ्यावे. म्हणजे मग रस्त्यात गाडी बंद पडणार नाही वा अन्य कांही अनर्थ उद्भवणार नाही. कुणाचीच गैरसोय होणार नाही. तसेच सुरक्षा यंत्रणेने ठिकठिकाणी (विशेषत: घाटमाथ्यावर, वळण-वळणावर) लावलेले बोर्ड हे तर सावधानतेचे इशारे असतात. पण त्याही बाबतीत "लक्षात कोण घेतो?" अशीच कांहीशी स्थिती आढळून येते. या एकूणच सर्वच बाबतीत वाहनचालक सतर्क राहून आपली भूमिका पार पाडील तर निश्चितच रस्ते अपघात बऱ्याचशा प्रमाणात कमी होतील किंबहुना ते होणारच नाहीत.

रस्ते अपघाताशी निगडीत असा दुसरा घटक म्हणजे पादचारी (रस्त्यावरून पायी-पायी चालणारे) "पादचारी सडकपार', 'रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे', 'रस्ता झेब्रा क्रॉसिंगवरूनच ओलांडावा,' या व अशा अनेक सूचनांचे जागोजागी फलक लावलेले दिसते. पण त्याकडेही पूर्णपणे डोळेझाकच केलेली दिसून येते. कित्येक पादचारी आपल्याच मस्तीत मुख्य रस्त्यावरूनच चालताना दिसतात. रस्ता हा फक्त आपल्या आणि आपल्याच मालकीचा आहे, अशा अविर्भावात त्यांचा वावर असतो. मोठमोठ्या शहरात, रस्त्यावरच्या वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. रस्त्यावरून वाहनांची सारखी 'ये-जा' सुरु असते. पण या कशाचिही पर्वा न करता पादचारी रस्त्यावरून निर्धास्तपणे चालत असतात. वाटेल तिथे आणि वाटेल तसा रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करीत असतात.

आणि त्यामुळेच रस्त्यावरील अपघात घडून येतात. अशावेळी त्या संबंधीत वाहनचालकांचा कांहीच अपराध नसताना तो मात्र साऱ्यांच्याच दोषास पात्र ठरतो. पण इथे खरेखरच "आम्ही पादचारी जबाबदारीने वागतो कां? आमुची याबाबतची भूमिका नीटपणे पार पाडतो कां?" मोठा अंतर्मुख होऊन विचार करावयास लावणारा प्रश्न आहे. आणि त्याचे उत्तरही अगदी सरळ साधेच आहे. 'मुळीच नाही!' आम्ही पादचारी आमुची भूमिका नीट पार पाडीत नाही. खरं तर पादचारी पथ (foot path) हा पायी चालणाऱ्यासाठी असतो. सारथ्याने त्याचाच वापर करावयास हवा. एकमार्गी पथ, द्विमार्गी पथ, चौफुल्यावरील, वळणावरील वाहतुक व्यवस्था, पथदिवे, सिग्नल्स, सुसज्ज पादचारी पथ अशी सारीच व्यवस्था सुरक्षा यंत्रणेने केलेली असते. पण आम्ही मात्र त्याचा पुरेपूर लाभ उठवित नाही. उलट 'नको त्याच गोष्टी' करीत असतो. भर रस्त्यावरून आम्ही पादचारी (कधीकधी रस्त्याच्या मधोमधही) चालण्याचा प्रयत्न करीत असतो. अगदी द्राविडी प्राणायामच करीत असतो. अगदी एखाद्या बागेत फिरायला जावं तसे गप्पा-टप्पा करीत चालत असतो. साहजिकच त्याचा परिणाम व्हायचा तोच होतो. रस्त्यावरील अपघात अटळ होऊन बसतात. खरं तर पादचाऱ्यांसाठी अगदी राजमार्ग म्हणजे फुटपाथच असतो. पण त्याचा वापर ते कां करीत नाहीत, तेच कळत नाही. फुटपाथ वरील मार्गक्रमण करण्यात कसलाच धोका संभवत नाही. अर्थात कांही मंडळी मात्र सुज्ञ नागरिकासारखे वागून आपली भूमिका अगदी व्यवस्थितपणे पार पाडीत असतात. त्यात विशेषत: वयोवृद्ध मंडळी जास्त असतात. अशाच एक आजी शहरवजा खेड्यात, बालवाडीतील मुलांना शाळेत 'ने-आण' करीत असतात. सत्तरीच्या घरातील त्या आजी, रस्त्यावरून चालण्याविषयी त्या लहानग्यांना सांगत असतात, "बाळांनो मोठ्या रस्त्यावरून नाही चालायचं. त्याच्या बाजूच्या वाटेने चालायचं. मातीचा रस्ता आपला आहे." आणि काय आश्चर्य ती सारी चिमुरड्यांची पलटण एका रांगेत आजीच्या पाठोपाठ चालत असतात. अशा प्रकारे रस्त्यावरून पायीपायी चालताना कोणत्या मार्गाने कसे चालावयाचे याची अगदी यथायोग्य तालीमच त्या आजी या चिमुरड्यांकडून करवून घेत असतात. रस्त्यावरून चालताना आपली भूमिका कशी पार पाडावी यांचे प्रात्यक्षिक त्या लहानग्यांना दाखविणाऱ्या त्या आजींना मी मनापासून धन्यवाद तर देतोच पण त्यांच्यापुढे नतमस्तकही होतो. रस्त्यावरील प्रवासाचा हा संस्कार त्या चिमुरड्यांना किती बरे प्रेरणादायीच ठरणारा आहे! भविष्यात ही मुले रस्त्यावरील चालण्याची आपली भूमिका निश्चितपणे उत्तमपणे पार पाडतील व त्यामुळे अपघातही घटतील यात शंकाच नाही. या लहानग्यांप्रमाणे प्रत्येक पादचारी व्यक्तीने आपली भूमिका पार पाडली तर रस्ते अपघात होणारच नाहीत. पण या उलटच वस्तुस्थिती दिसून येते.

कॉलेजीयन, शाळकरी मुले, युवक युवती ही सारीच मंडळी रस्त्यावरून चालताना साऱ्याच नियमांचे उल्लंघनच करीत असतात. खर तर रस्त्यावरील नियमांचे अगदी काटेकोरपणे पालन करावे, त्याबाबतची आपली भूमिका आदर्शवत असावी, अशी अपेक्षा ज्यांच्याकडून करावी तोच युवा वर्ग अगदी स्वैरपणे, रस्त्यावरून वाटेल तसा धुडगूस घालत हिंडताना दिसतो. घोळक्या घोळक्याने, गप्पा, मौजमजा, मस्ती, करीत जाणाऱ्या या मंडळींना कसलाच धरबंध राहिलेला नसतो. आणि मग त्यामुळेच अपघात घडतात. हे सारे टाळावयाचे असेल तर प्रत्येक पादचारी व्यक्तीने, सुज्ञ अशा युवावर्गाने सर्वतोपरीने प्रवासाच्या योग्य त्या सवयी लावून घेतल्या पाहिजेत. आपापली भूमिका नीटपणे पार पाडलीच पाहिजे. तरच 'रस्ते अपघातावर' नियंत्रण येईल.

यानंतरचा रस्ते अपघाताला कारणीभूत ठरणारा घटक म्हणजे फेरीवाले. फेरीवाल्यांचाही वर्ग फार मोठ्या प्रमाणात रस्त्यावरील अपघात घडवित असतात. रस्ते मग ते छोटे-मोठे असोत ते केवळ वाहतुकीसाठी (वाहनांसाठी व प्रवाशांसाठीच) असतात. पण तेच रस्ते या फेरीवाल्यांसाठी दुकानांची जागा म्हणून वापरण्यात येते. रस्त्यावरच ही मंडळी मोठ्या दिमाखात आपली दुकाने थाटतात. परिणामी वाहनांची कोंडी निर्माण होऊन रस्त्यावर अपघात घडतात. त्यांच्या दुकानांनी व्यापलेली रस्त्यावरची जागा, प्रवाशांची ये-जा, वाहनांची वर्दळ या साऱ्यामुळेच धोकादायक स्थिती निर्माण होत जाते. व त्याचे पर्यवसान एखाद्या मोठ्या अपघातात होते. या फेरीवाल्यांचा व्यवसाय हा त्यांच्या पोटापाण्याचा व्यवसाय असला तरी तो अशा तऱ्हेने रस्त्यावरच हातपाय पसरून असेल तर ते मात्र बिलकुल समर्थनीय नाही. ते अयोग्यच आहे.

फेरीवाल्यांनी आपला हक्क (विक्रेत्यांनी कोणताही व्यवसाय करण्याचा) बजावताना आपल्यावरील कर्तव्याची जाण ठेवावयास हवी. त्यांनी आपला व्यवसाय हातगाडीच्या माध्यमातून किंवा डोईवर पाटी घेऊन दारोदार हिंडून करावयास हवा. फेरीवाल्यांचा हा व्यवसाय अगदी राजरोसपणे चालू असतो कारण त्यांना उत्तम साथ मिळते, ती रस्त्यावरून जा-ये करणाऱ्या ग्राहकांची! व हे खरेदी करणारे ग्राहक सर्वसामान्यच नव्हे तर अगदी उच्चभ्रू वर्गातील नागरिकच जास्त असतात. त्यामुळे फेरीवाल्यांइतकेच हे रस्त्यावर खरेदी करणारे नागरिकच जबाबदार असतात. या रस्त्यावरील फेरीवाल्यांच्या दुकानातून वस्तू खरेदी केल्याच नाहीत तर अशी ही दुकाने थाटलीच जाणार नाहीत. आणि मग प्रवाशांसाठी नेहमीच रस्ता मोकळा राहील. फेरीवाल्यांनीही याबाबतची आपली निश्चित भूमिका घ्यावी. म्हणजे मग त्यांच्यामुळे रस्ते अपघात होणार नाहीत.

रस्त्यावरील अपघात आणखी एका घटकाद्वारे होत असतात. तो घटक म्हणजे रस्त्यांची बांधकाम किंवा डागडुजी करणारे इंजिनिअर्स किंवा कॉन्ट्रॅक्टर्स होय. सार्वजनिक बांधकाम खाते, त्या त्या ठिकाणच्या रस्त्यांच्या आवश्यक मागणीनुसार पुरवठा करीत असते. व संबंधीत अभियंत्याकडून टेंडर मागवून ते पास करून त्याला रस्ता बांधणीसाठी किंवा दुरुस्ती करण्यासाठी परवाना दिला जातो. एकदा का असा परवाना मिळाला की संबंधीत कॉन्ट्रॅक्टर्स आपल्या मर्जीनुसार बांधकामाला सुरुवात करतो आणि मग कित्येकदा त्यासाठी लागणारे मटेरियल (दगड, वाळू, स्टील, सिमेंट, डांबर) अगदी निकृष्ट निकस दर्जाचे वापरण्यात येते किंवा सिमेंट डांबराचा वापर अत्यल्पच केला जातो. व त्यामुळे अशा प्रकाराने तयार झालेले रस्ते अल्पावधीतच खराब खड्डेमय होऊन जातात. ते खचतात, जागोजागी खड्डेच खड्डे पडतात ते वाढतच जातात आणि पावसाळ्यात पावसाच्या माऱ्याने या रस्त्यांची अक्षरशः चाळणच होऊन जाते. या खड्ड्यांची डबकी तयार होतात त्यात पाणी साचल्यामुळे अपघातांची मालिकाच सुरु होते. कधी एखादी माणसांनी खचाखच भरलेली बसच उलटली जाते तर कधी गॅस सिलेंडरचा ट्रकच उलटा होऊन भीषण स्वरुपाची आगही लागते. एखादी टुरिस्ट बस दरीतही कोसळते. व अशा अपघातात प्रचंड जिवित व वित्तहानी होत असते. या सर्व अपघाताचे मूळ असते. रस्त्यांचे कच्चे, कसेतरीच केलेले बांधकाम! व ते करणारे कॉन्ट्रॅक्टर्स किंवा इंजीनिअर्सच जबाबदार असतात. त्यांच्या हलगर्जीपणामुळे किंवा अधिक आर्थिक लाभ उठविण्यासाठी हे सारे अनर्थ घडत असतात. इथे या संबंधीत मंडळींनी समाजहिताच्या दृष्टीने थोडा जरी विचार केला तरी असले भयानक अपघात टाळता येतील. आपला व्यवसाय करताना तो किफायतशीर व्हावा अशी इच्छा बाळगणे, यात काहीच गैर नाही. पण अधिकाधिक लाभ उठविण्याच्या लोभापायी, निकृष्ट दर्जाचे मटेरियल वापरून आपला कार्यभार कसातरी आटोपून देणे हे सर्वस्वी चुकीचेच नव्हे तर नीती नैतिकदृष्ट्या चोरीच आहे. आणि या संबंधीत मंडळींनी नुसता निव्वळ नफ्याचा फायद्याचाच विचार न करता लोकहितही साधावे. खड्ड्यांमुळे हे सारे अपघात घडतात. ते खड्डेच पडणार नाहीत याची योग्य आणि पुरेपूर दक्षता घेतली तर आपण केलेल्या कामाचे व श्रमाचे सार्थकच होईल. आणि म्हणूनच रस्ते अपघातांना आपण दुराव्ये ही कारण ठरणार नाहीत हीच भूमिका या सर्व संबंधीतांनी घेतली तर ते सर्वांच्याच हिताचेच ठरेल.

एकंदरीत काय तर रस्ते अपघात टाळण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपली योग्य ती भूमिका बजावली पाहिजे. त्यासाठी केवळ वर उल्लेख केलेल्या घटकांचाच समावेश आहे असे नव्हे तर अगदी सर्वसामान्य नागरिकापासून उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या मंडळींनीही याबाबतीत योग्य ती भूमिका बजावली पाहिजे. आपल्या हक्कांबरोबरच कर्तव्यांचीही जाण ठेवली तर कित्येक अप्रिय गोष्टी टाळता येतील. रस्त्यावरील अपघात ही त्यातीलच एक बाब आहे. योग्य निर्णय, सारासार विचार आणि योग्य भूमिका घेऊन तीही आपल्याला टाळता येऊ शकेल.

— अशोक पांडुरंग ठमाळ,
अलिबाग.